नि.फौ.ख. क्रमांक. २३३/२०२०
सरकार विरुध्द पांडूरंग
निशाणी क्रमांक –८१

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०५**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – बाबुराव दत्तात्रय चाटे,
वय -४८ वर्षे, धंदा - शेती,
रा. चाटेवाडी, किनगांव, ता.अहमदपूर, जि. लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे**

**०१.** वाळुचा टिपर पोलीस ठाण्यातून पळुन आणल्यानंतर किनगांवातील बाजारात टिपर चालकाने खाली केला व पळुन गेला होता. टिपर चालक पळुन जात असताना पोलीस गोखले व अनसापूरे यांनी पकडले होते. त्यावेळी मी ती वाळु माझ्या ट्रक्टर मध्ये भरुन पोलीस ठाण्यात टाकली होती. पोलीसांनी माझे तपासटिपन नोंदविले होते.

- सरतपास पुर्ण.

**आरोपीं तर्फे उलटतपास वकील श्री. आर.ई. भुरकापल्ले यांच्यामार्फत सुरु:-**

**०२.** मी घटनेच्या वेळी व आजही किनगांव पंचायतीचा सदस्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसासोबत माझे चांगले संबंध आहेत. माझ्या विरुद्ध वाहान चोरीचा गुन्हा किनगांव ठाण्यात दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला त्या गुन्हयात मदत करतो या गुन्हयात सहकार्य करा असे सांगून माझे तपासटिपन नोंदविले. हे म्हणणे खरे आहे की, टिपर चालकाने किनगांव बाजारात वाळु खाली केली ते मी प्रत्यक्ष पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ट्रकटरने वाळु पोलीस ठाण्यात नेऊन टाकली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक -२५.११.२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – गोविंद ज्ञानोबा तांदळे,
वय -४० वर्षे, धंदा - होमगार्ड,
रा. अहमदपूर,ता.अहमदपूर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे</u>**

**०१.** दि.०५/१०/२०२० रोजी माझी होमगार्ड म्हणून लॉक-अप येथे नेमणूक होती. माझी डयुटी संपल्यानंतर मला टिपर चालक वाळु पोलीस ठाण्यातून घेवून गेल्याचे समजले. मला टिपर चालकाचे नाव माहिती नाही.

- सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीं तर्फे उलटतपास वकील श्री. आर.ई. भुरकापल्ले यांच्यामार्फत सुरु</u>:-**

**०२.** उलटतपास नाकारला.

फेर तपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक -२५.११.२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

अहमदपूर.